**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.**

**जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई संचलित,**

# कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा.

ता.पाटोदा, जि. बीड.

## नियमित कार्यक्रम अहवाल

**सन 2022 - 2023**

# राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक अहवाल

**प्राचार्य**

डॉ. विश्वास कल्याणराव कदम

कार्यक्रमाधिकारी

**प्रा. डॉ. एम. आर. शिंदे**

**प्रा. जे. बी. रकटे**

**NOT ME.. BUT YOU..**

# अनुक्रमणिका

| अ.क्र. | दिनांक | कार्यक्रमाचे नाव |
|---|---|---|
| 1 | 06 मे 2022 | राजर्षी शाहु महाराज शताब्दी दिना निमित्त अभिवादन |
| 2 | 30/05/2022 ते 05/06/2022 | माझी वसुंधरा अभियान |
| 3 | 03 जून 2022 | विश्व सायकल दिवस |
| 4 | 05 जून 2022 | जागतिक पर्यावरण दिवस |
| 5 | 06 जून 2022 | शिवस्वराज्य दिन |
| 6 | 21 जून 2022 | आंतरराष्ट्रीय योग दिन |
| 7 | 26 जून 2022 | राजर्षी शाहू महाराज जयंती 'सामाजिक न्याय दिन' |
| 8 | 1 जुलै 2022 | वसंतराव नाईक जयंती 'कृषी दिन'वृक्षारोपण सप्ताहाचे आयोजन |
| 9 | 11 जुलै 2022 | जागतिक लोकसंख्या दिन |
| 10 | 23 जुलै 2022 | लोकमान्य टिळक जयंती साजरी |
| 11 | 01 ऑगस्ट 2022 | लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती |
| 12 | 01 ऑगस्ट 2022 | विदर्भ व महाराष्ट्रात अतिवृष्टी व पूरग्रस्तांना पाटोदा शहरात मदत फेरीचे आयोजन |
| 13 | 02 ते 06 ऑगस्ट 2022 | वृक्षारोपण सप्ताहाचे आयोजन |
| 14 | 05 ऑगस्ट 2022 | हर घर तिरंगा प्रबोधन फेरी (रॅली) |
| 15 | 09 ऑगस्ट 2022 | क्रांती दिन |
| 16 | 08 ऑगस्ट ते 14 ऑगस्ट 2022 | स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयकॉनिक सप्ताहाचे आयोजन |
| 17 | 09 ते 17 ऑगस्ट 2022 | स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अंतर्गत राज्य संरक्षित हुतात्मा स्मारक परिसर स्वच्छता अभियान |
| 18 | 13 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट 2022 | हर घर तिरंगा अभियान |
| 19 | 14 ऑगस्ट 2022 | ध्वजारोहण' कार्यक्रम |
| 20 | 15 ऑगस्ट 2022 | स्वातंत्र्य दिन - 75 वा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव· |
| 21 | 17 ऑगस्ट 2022 | सामूहिक राष्ट्रगीत |
| 22 | 20 ऑगस्ट 2022 | कालजयी सावरकर लघुपटाचे आयोजन |
| 23 | 05 सप्टेंबर 2022 | शिक्षक दिन |
| 24 | 08 सप्टेंबर 2022 | आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन |

| अ.क्र. | दिनांक | कार्यक्रमाचे नाव |
|---|---|---|
| 25 | 15 सप्टेंबर 2022 ते 02 ऑक्टोबर 2022 | गावच्या दृश्यमान स्वच्छतेची राष्ट्रव्यापी मोहीम/अभियान |
| 26 | 16 सप्टेंबर 2022 | श्रमदान |
| 27 | 17 सप्टेंबर 2022 | मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन |
| 28 | 24 सप्टेंबर ते 02 ऑक्टोबर 2022 | राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त कार्यप्रसिध्दी सप्ताह |
| 29 | 27 सप्टेंबर 2022 | लम्पी आजार जनजागृती अभियान |
| 30 | 30 सप्टेंबर 2022 | श्रमदान |
| 31 | 02 ऑक्टोबर 2022 | महात्मा गांधी आणि लालबहादुर शास्त्री यांची जयंती |
| 32 | 10/10/2022 ते 17/10/2022 | स्वच्छ भारत अभियान |
| 33 | 10 ऑक्टोबर 2022 | भव्य रक्तदान शिबिर |
| 34 | 15 ऑक्टोबर 2022 | डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम ‘वाचन प्रेरणा दिवस’ |
| 35 | 22 ऑक्टोबर 2022 | वृक्षारोपण |
| 36 | 30 ऑक्टोबर 2022 | सरदार वल्लभ भाई पटेल जयंती 'राष्ट्रीय एकात्मता दिवस' व माजी पंतप्रधान इंदिरा गांधी पुण्यतिथी 'बलिदान दिवस |
| 37 | 14 नोव्हेंबर 2022 | पंडित जवाहरलाल नेहरू जयंती- बाल हक्क दिन व स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासी वीर बिरसा मुंडा जयंती |
| 38 | 24 नोव्हेंबर 2022 | राष्ट्रीय किशोर स्वास्थ कार्यक्रम |
| 39 | 26 नोव्हेंबर 2022 | सविंधान दिन |
| 40 | 01 डिसेंबर 2022 | जागतिक एड्स दिन |
| 41 | 06 डिसेंबर /2022 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन |
| 42 | 10 डिसेंबर 2022 | आतंरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस |
| 43 | 3 जानेवारी 2023 | सावित्रीबाई फुले जयंती |
| 44 | 12 जानेवारी 2023 | राजमाता जिजाऊ मॉसाहेब व स्वामी विवकानंद जयंती युवा सप्ताहाचे आयोजन |
| 45 | 14 जानेवारी 2023 | विद्यापीठ नामविस्तार दिन |
| 46 | 25 जानेवारी 2023 | राष्ट्रीय मतदार दिवस |
| 47 | 26 जानेवारी 2023 | प्रजासत्ताक दिन |

| अ.क्र. | दिनांक | कार्यक्रमाचे नाव |
|---|---|---|
| 48 | 07 फेब्रुवारी 2023 ते 13 फेब्रुवारी 2023 | वाहतूक सुरक्षा सप्ताह |
| 49 | 19 फेब्रुवारी 2023 | छत्रपती शिवाजी महाराज जयंती |
| 50 | 23 फेब्रुवारी 2023 | संत गाडगेबाबा महाराज जयंती |
| 51 | 8 मार्च 2023 जागतिक | जागतिक महिला दिन |
| 52 | 10 मार्च 2023 | सावित्रीबाई फुले पुण्यतिथी |
| 53 | 12 मार्च 2023 | यशवंतराव चव्हाण जयंती |
| 54 | 18 मार्च 2023 | शहाजीराजे भोसले जयंती |
| 55 | 21 मार्च 2023 | जागतिक वन दिवस |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,**

## कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा.

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## नियमित कार्यक्रमाचा अहवाल

## सन 2022-2023

**प्रस्तावना**–

सन **2022 – 2023** या शैक्षणिक वर्षाचा नियमित कार्यक्रमाचा अहवाल सादर करताना विशेष आनंद होत आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय सेवा योजना विभाग काम करत असताना या शैक्षणिक वर्षात विशेष कार्य करावे लागले आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाने नेहमीपेक्षा अधिक दर्जेदार काम करून महाविद्यालयाबरोबर विद्यापीठाचा व शासन कार्यात आपला सहभाग अत्यंत महत्त्वपूर्ण नोंदवला आहे. राष्ट्रीय सेवा योजना विभागाने या शैक्षणिक वर्षात माननीय प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. मदन शिंदे व प्रा. श्रीमती ज्योती रकटे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, रासोयोचे स्वयंसेवक, विद्यार्थी यांनी मोलाचे कार्य केले आहे. याचा अहवाल आपल्या माहितीस्तव सादर करीत आहोत.

**06 मे 2022 – राजर्षी शाहु महाराज शताब्दी दिना निमित्त अभिवादन -**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 06 मे 2022 रोजी राजश्री शाहू महाराज यांच्या शंभराव्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. सकाळी ठीक 10.00 वाजता 100 सेकंद स्तब्ध उभा राहून लोकराजा राजर्षी शाहु महाराज यांच्या विषयीची कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. गवारे एन. बी., प्रा. डॉ. जाधव एस. एम., प्रा. डॉ. वंदन जाधव, प्रा. डॉ. लोखंडे बी. बी., प्रा. जोशी बि. डी., प्रा. भगत, श्री. शिंदे अनिल राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. मदन शिंद, प्रा. श्रीमती ज्योती रकटे आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.




**(30/05/2022 ते 05/06/2022) माझी वसुंधरा अभियान –**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या वतीने महाराष्ट्र शासनाचा 'माझी वसुंधरा अभियान' आणि युनीसेफ महाराष्ट्र यांच्याकडून राबविण्यात येणाऱ्या 'माझी वसुंधरा अभियानांतर्गत पर्यावरण जनजागृती व स्वच्छता सप्ताह दिनांक 30 मे 2022 ते 05 जुन 2022 या दरम्यान राबविण्यात आला. या अंतर्गत महाविद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला.पर्यावरण संवर्धन, सामाजिक बांधिलकी पाळा, कचरा जाळणे टाळा, वायू प्रदूषनाला ब्रेक लावा, ओल्या व सुक्या

कचऱ्याची योग्य विलेवाट लावा, आपला परिसर स्वच्छ व सुंदर ठेवा, आरोग्याचे नियम पाळा हे संदेश देणारे विविध उपक्रम राबविण्यात आले. या अंतर्गत वृक्षारोपण, स्वच्छता अभियान आणि पर्यावरण जनजागृती करणे तसेच मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करून 'माझी वसुंधरा अभियान' हा उपक्रम राबविण्यात आला. या वृक्षारोपणाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर, प्रा.डॉ. एस. एम. जाधव, प्रा. डॉ. वंदन जाधव, प्रा. डॉ. अहिरे बी. एम., महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, विद्यार्थी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. मदन शिंदे,प्रा. श्रीमती ज्योती रकटे तसेच राष्ट्रीयसेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.








**03 जून 2022 विश्व सायकल दिवस-**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दिनांक 04/06/2022 ते 10/06/2022 यादरम्यान तीन जून 2022 हा दिवस 'विश्व सायकल दिवस' म्हणून महाविद्यालयात साजरा करण्यात आला.विश्व सायकल दिवसाच्यानिमित्ताने महाविद्यालय व पाटोदा शहरातभव्य सायकलयात्रेचे आयोजन करण्यात आले.विविध घोषवाक्यांद्वारेविश्व सायकल दिनाचे महत्त्व नागरिकांना समजावण्यात आले.या यात्रेचा शुभारंभ प्राचार्य डॉक्टर सुभाष कदम यांच्या हस्ते करण्यात आला. या यात्रेमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर, प्रा. किर्दक विनोद, प्रा. डॉ. वंदन जाधव, प्रा. डॉ. अहिरे बी. एम., प्रा. डॉ. सय्यद एस. आर., प्रा. घाडगे एस. व्ही., महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, विद्यार्थी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. मदन शिंदे, प्रा. श्रीमती ज्योती रकटे तसेच राष्ट्रीयसेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.



झुंजार नेता

जय भवानी महाविद्यालयात विश्व सायकल दिन साजरा

पाटोदा,दि.५ (प्रतिनिधी):- येथिल जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालयात राष्टीय सेवा योजना विभाग आयोजित दिनांक: ३० मे २०२२ ते ५ जुन २०२२ या काळात वसुधंरा अभियानांतर्गत पर्यावरण संवर्धन व स्वच्छता सप्ताह साजरा केला जात आहे.तयाचाच एक भाग म्हणुन विश्व सायकल दिना चे औचित्य साधुन महाविद्यालयात सायकल यात्रेचे आयोजन करण्यात आले .या यात्रेचा शुभारंभ प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या हस्ते करण्यात आला.व या यात्रेत सायकल वरून विद्यार्थ्यांनी पाटोदा शहरात रॅली काढुन इंधन विरहित सायकल वापरण्याचा संदेश देणारे फलकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाचा चांगला संदेश दिला . या आगळ्या वेगळ्या सायकल यात्रेने लोकांचे लक्ष वेधून घेतले.या यात्रेत बहुसंख्य विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीनी सहभाग नोंदवला.महाविद्यालयाच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.ही सायकल यात्रा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली राष्टीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा.सोमनाथ घाडगे,व प्रा.डॉ. बंडू लोखंडे,प्रा.बाळासाहेब जोशी, प्रा.शिवाजी भोरे व कुणाल काळे यांनी अथक परिश्रम घेतले.






**05 जून 2022 जागतिक पर्यावरण दिवस –**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक 05 जून 2022 'जागतिक पर्यावरण दिवस' महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला. पृथ्वीच्या संरक्षण, संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. या वर्षीची जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना (World Environment Day 2022 Theme) आहे. ‘केवळ एकच पृथ्वी’ (Only One Earth). या दिवसाचे सर्व महत्त्वाचे कार्यक्रम स्वीडनमध्ये आयोजित करण्यात आले आहेत. ओन्ली वन अर्थ या थीम मागचा विचार आहे की शांतता आणि सलोख्यासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी जगाने एकत्र येऊन काम करणे. पर्यावरणपूरक लाइफस्टाइल (lifestyle) तयार करण्यासाठी धोरण तयार होईल. या संकल्पनेमागचा उद्देश पृथ्वीचे संवर्धन हा आहे. पृथ्वी हे आपले एकमेव घर आहे आणि ते येणाऱ्या पिढ्यांसाठी जपले पाहिजे हा या संकल्पनेमागचा हेतू आहे. वृक्षारोपणा प्रसंगी प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. मदन शिंदे, प्रा. श्रीमती ज्योती रकटे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

 

**06 जून 2022 शिवस्वराज्य दिन –**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, आय. क्यू. ए. सी., इतिहास व राज्यशास्त्र विभागाच्यावतीने 'शिवस्वराज्य दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक झुंजार नेता चे पत्रकार श्री विजय जाधव,प्रा.डॉ. गव्हाणे एम. पी., प्रा. डॉ. सय्यद एस.आर., कार्यालयीन अधीक्षक श्री. आबेद चाऊस यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. प्रथमतः प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रमुख पाहुणे डॉ महारुद्र गव्हाणे यांनी शिवकालीन राज्यव्यवस्था ही लोकांना कल्याणकारी होती हे सांगून आजच्या काळात शिवस्वराज्याप्रमाणे राज्यकारभार केला तर खरी लोकशाही निर्माण होईल अशा आशावाद व्यक्त केला. शेवटी अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी शिवराज्याभिषेक दिन हा शिवस्वराज्य दिन साजरा करण्यामागची भूमिका विषद करून शिवराज्य निर्माण व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन प्रा. सोमनाथ घाडगे यांनी केले तर प्रास्ताविक प्रा. डॉ. लोखंडे बी. बी. यांनी केले. आभार प्रा. डॉ. वंदन जाधव यांनी मांडले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी तसेच स्वयंसेवक उपस्थित होते.






दैनिक झुंजार नेता बीड

मंगळवार दिनांक : ८ जून २०२२

**जय भवानी महाविद्यालयात शिव स्वराज्य दिन उत्साहात साजरा**

पाटोदा ७ (प्रतिनिधी -येथिल जयभवानी महाविद्यालयात शिवराज्याभिषेक दिन हा शिव स्वराज्य दिन म्हणुन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य, डॉ. विश्वास कदम हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणुन दैनिक झुंजारनेता चे पत्रकार श्री.विजय जाधव,ग्रंथपाल प्रा.डॉ. महारुद्र गव्हाणे, प्रा.डॉ. सय्यद एस.आर.कार्यालयीन अधिक्षक श्री.आबेद चाऊस यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुजन करण्यात आले.प्रस्ताविक प्रा.लोखंडे बी.बी. यांनी केले.प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. महारुद्र गव्हाणे यांनी शिवकालीन राज्यव्यवस्था ही लोककल्याणकारी होती हे सांगुन आजच्या काळात शिव स्वराज्याप्रमाणे राज्यकारभार केला तर खरी लोकशाही निर्माण होईल असा अशावाद व्यक्त केला.शेवटी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी शिवराज्याभिषेक दिन हा शिव स्वराज्य दिन साजरा करण्यामागची भूमिका विशद करून शिव स्वराज्य निर्माण व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय. सेवा योजना विभाग इतिहास विभाग, व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.कार्यक्रमाचे संचलन इतिहास विभाग प्रमुख प्रा.सोमिनाथ पाडगे यांनी केले तर आभार प्रा डॉ. वंदन जाधव यांनी व्यक्त केले.या प्रसंगी सर्व प्राध्यापक बंधु व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

**21 जून 2022 -आंतरराष्ट्रीय योग दिन –**

जयभवानी कलाव विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 21 जून हा 'आंतरराष्ट्रीय योग दिन' मोठ्या उत्साहात सकाळी ठीक 6:00 वाजता महाविद्यालयातील प्रांगणात योग दिन साजरा करण्यात आला. या योग दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष माननीय श्री. शिवभूषण जाधव हे होते तर बीड जिल्हा पतंजली योग समितीचे प्रशिक्षक श्री. संदीप रामकिसन पडोळे व श्री रत्नाकर पवार हे होते. सर्वप्रथम योगप्रशिक्षक व प्रमुख पाहुणे यांचा राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर हे होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून योग दिनाची सुरुवात करण्यात आली. योगशिक्षक श्री संदीप राधाकिसन पडोळे यांनी योग आणि प्राणायाम शिकवताना त्याचे दैनंदिन जीवनातील फायदे आणि महत्त्व समजावून सांगितले. एक

तासयोग प्रशिक्षकांनी विद्यार्थी व प्राध्यापक यांना योगाच्या सर्व प्रकारचे प्रशिक्षणदिले. योग हा केवळ एक दिवसापुरता मर्यादित नसून दररोज योग आणि प्राणायाम करण्याचे विद्यार्थी प्राध्यापक आणि नागरिकाला आव्हान केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. मदन शिंदे, प्रा. श्रीमती ज्योती रकटे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.



चंपावतीपत्र वार- शुक्रवार दि.२४-०६-२०२२ ६

# जय भवानी महाविद्यालयात राष्ट्रीय योग दिन साजरा

पाटोदा । वार्ताहार

जय भवानि कला.व विज्ञान महाविद्यालयात २१ जून हा राष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला सकाळी ठिक ६:०० वाजता महाविद्यालयाच्या मैदानावर बीड जिल्हा पतंजली योग समितीचे प्रशिक्षक श्री.संदिप रामकिसन पडोळे व श्री.रत्नाकर पवार यांनी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी यांना प्रशिक्षन दिले

.या योग प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य, डॉ.विश्वास कदम,प्रमुख पाहुणे म्हणुन राष्ट्रवादी कॉंग्रेस चे तालुकाध्यक्ष मा.श्री.शिवभूषण जाधव ही होते.

प्रारंभी योग प्रशिक्षक व अध्यक्ष ,प्रमुख पाहुणे यांचा राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला.१ तास योग प्रशिक्षकांनी विद्यार्थी व प्राध्यापक यांना योगा च्या सर्व प्रकाराचे प्रशिक्षण दिले.या प्रसंगी महाविद्यालयातील कु.अनुराधा ढेरे,कु.अनुराधा ढवळे,कु.प्रतिक्षा ढेरेकु.प्रतिक्षा पोटे या विद्यार्थीनींचा प्रशिक्षकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग व शारिरीक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन केलें होते.

योगा प्रशिक्षण शिबीर व राष्ट्रीय योगा दिन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा येजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा.सोमनाथ घाडगे, प्रा.शिवाजी भोरे यांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे संचलन प्रा.डॉ.बंडू लोखंडे यांनी केले व आभार प्रा. गोपाळ धांडे यांनी मानले.या योगा प्रशिक्षणात सर्व प्राध्यापव व बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग नोदंवला.







**26 जून 2022 - राजर्षी शाहू महाराज जयंती 'सामाजिक न्याय दिन'-**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने 26 जून 2022 हा दिवस लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांची जयंती 'सामाजिक न्याय दिन'म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आला. या जयंती प्रसंगी महाविद्यालयाचे माझी प्राचार्य डॉ. सुनिल जाधव सर, उपप्राचार्य नानासाहेब गवारे यांच्या हस्ते लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर त्यांना सामूहिक अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. मदन शिंदे, प्रा. श्रीमती ज्योती रकटे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.



लोकमत औरंगाबाद, गुरुवार, दि. ३० जून २०२२ epaper.lokmat.com २

पाटोदा येथील जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी करण्यात आली.

## जयभवानी कॉलेजात राजर्षी शाहू महाराज यांची जयंती

लोकमत न्यूज नेटवर्क

बीड : पाटोदा येथील जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालयात लोकनायक राजर्षी शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरी करण्यात आली.

याप्रसंगी माजी प्राचार्य तथा समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. सुनील जाधव, उपप्राचार्य प्रा. डॉ. नानासाहेब गवारे यांच्या हस्ते छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर त्यांना सामूहिक अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने करण्यात आले होते. याप्रसंगी प्रा. डॉ. वंदन जाधव, प्रा. बंडू लोखंडे, प्रा. शिवाजीराव भोरे, प्रा. भगत ए. डी., प्रा. बी. डी. जोशी, अनिल शिंदे, कुणाल काळे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.




**1 जुलै 2022 वसंतराव नाईक जयंती 'कृषी दिन'वृक्षारोपण सप्ताहाचे आयोजन-**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीनेमहाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री माननीय वसंतराव नाईक यांचा जन्मदिवस 'कृषी दिन' म्हणून साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य नानासाहेब गवारे सर, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. सय्यद एस. आर. हे होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते माजी मुख्यमंत्री माननीय वसंतराव नाईकयांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व मान्यवरांचा सत्कार करून

त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून वृक्षारोपणसप्ताहाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, कार्यक्रमाधिकारी उपस्थित होते.



झुंजार नेता

महाराष्ट्र सोमवार दि.४ जुलै २०२२ R.N.I.NO.16856/68\. Postal No - L/117/RNP/ Be

बीड-महाराष्ट्र

महत्वाचे

जय भवानी महाविद्यालयात वसंतराव नाईक यांची जयंती साजरी

पाटोदा दि ३( प्रतिनिधि ) येथिल जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे प्रणेते स्वर्गीय वसंतराव नाईक यांचा १ जुलै हा जन्म दिवस कृषीदिन म्हणुन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, या कार्यक्रमाचे अध्क्ष म्हणुन उपप्राचार्य डॉ.नानासाहेब गवा तर प्रमुख पाहुणे म्हणुन हिंदि विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.सय्यद एस.आर.हे उपस्थित होते.प्रारंभी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुजन करण्यात आले.व त्यांना सामुहिक अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा विभागाच्या वतीने करण्यात आले होते.कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.सोमनाथ घाडगे यांनी केले.तर संचलन प्रा.बंडू लोखंडे यांनी केले. व आभार प्रा.गोविंद बामदळे यांनी मानले, या कार्यक्रमास सर्व प्राध्यापक वृंद,व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

**11 जुलै 2022 – जागतिक लोकसंख्या दिन –**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने 11 जुलै 2022 रोजी जागतिक लोकसंख्या दिन या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. विश्वास कदम हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सोमनाथ घाडगे होते, प्रा. डॉ. सय्यद एस.आर. हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा.सोमीनाथ घाडगे यांनी लोकसंख्या वाढ ही समस्या सांगून त्यावर उपाय योजना सांगितल्या. शेवटी अध्यक्ष समारोप करताना प्राचार्य डॉ. विश्वास

कदम सर यांनी लोकसंख्या दिन साजरा करण्यामागील भूमिका विशद करून लोकसंख्या वाढ ही सर्व समस्यांचे मूळ आहे. तेव्हा आपण सर्वांनी लोकसंख्या वाढ रोखण्यासाठी प्रयत्न करावेत. असा आशावाद व्यक्त केला. कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ. अशोक देवगुडे यांनी केले तर प्रास्ताविक प्रा. डॉ. सुनील जाधव यांनी केले तर या कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. बंडू लोखंडे यांनी मांडले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, बहुसंख्य विद्यार्थी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी तसेच स्वयंसेवक उपस्थित होते.



चंपावतीपत्र वार-बुधवार दि.१३-७-२०२२

जय भवानी महाविद्यालयात जागतिक लोकसंख्यादिन साजरा

पाटोदा । वार्ताहार

दि.११ जुलै येथिल जय भवानी महाविद्यालयात ११ जुलै हा जागतिक लोकसंख्या दिन म्हणुन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणुन प्रा.सोमिनाथ घाडगेहे होते तर प्रा.डॉ.सय्यद सर,प्रा.डॉ.सुनिल जाधव यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ.सुनिल जाधव यांनी केले.प्रमुख वक्ते प्रा.सोमिनाथ घाडगे यांनी लोकसंख्या वाढ हि समस्या सांगुन त्यावर उपाययोजना सांगितल्या.शेवठी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी लोकसंख्यादिन साजरा करण्यामागील भूमिका विषद करून लोकसंख्यावाढ ही सर्व समस्यांचे मुळ आहे.तेव्हा आपण सर्वांनी लोकसंख्यावाढ रोखण्यासाठी प्रयत्न करावेत !असा अशावाद व्यक्त केला.

या कार्यक्रमाचे आयोजन समाजशास्त्र विभागाच्या वत्तीने करण्यात आले होते. नशा विरोधी दिनानिमित्त प्रा.डॉ.चंदन जाधव यांनी नशा विरोधी शपथ दिली.या कार्यक्रमाचे संचलन प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी केले .तर अभार प्रा.डॉ.बंडू लोखंडे यांनी केले.या प्रसंगी सर्व प्राध्यापक व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

**23 जुलै 2022 लोकमान्य टिळक जयंती साजरी -**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने 23 जुलै 2022 रोजी लोकमान्य टिळक जयंती साजरी करण्यात आली. प्रथमतः लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून इतिहास विभाग प्रमुख प्रा.सोमनाथ घाडगे हे होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. बंडू लोखंडे यांनी केले प्रमुख पाहुणे प्रा. सोमनाथ घाडगे यांनी लोकमान्य

टिळक यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. शेवटी अध्यक्ष समारोप करताना प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर यांनी लोकमान्य टिळकांच्या कार्याचा विद्यार्थ्यांनी आदर्श घ्यावा असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ. रामकृष्ण प्रधान यांनी केले तर आभार प्रा. डॉ. भास्कर अहिरे यांनी मांनले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवक उपस्थित होते.



चंपावतीपत्र वार-मंगळवार दि. २६-७-२०२२

**जय भवानी महाविद्यालयात लोकमान्य टिळक जयंती साजरी**

पाटोदा | वार्ताहर

येथिल जय भवानी महाविद्यालयात लोकमान्य टिळक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विश्वास कदम हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन इतिहास विभाग प्रमुख प्रा. सोमनाथ घाडगे हे होते. प्रथम लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या हस्ते पुजन करण्यात आले. नतंर सार्वजनिक अभिवादन करण्यात आले. प्रस्ताविक प्रा. डॉ. बंडू लोखंडे यांनी केले. प्रमुख पाहुणे प्रा. सोमनाथ घाडगे यांनी लोकमान्य टिळक यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला शेवटी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य विश्वास कदम यांनी लोकमान्य टिळकाच्यां कार्यांचा विद्यार्थ्यांनी आदर्श घ्यावा !असे अहवान केले. या कार्यक्रमाचे संचलन प्रा. रामकृष्ण प्रधान यांनी केले व आभार प्रा. भास्कर आहिरे यांनी मानले. या प्रसंगी सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

**01 ऑगस्ट 2022- लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी-**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने 01 ऑगस्ट 2022 रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली. प्रथमतः महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गवारे नानासाहेब व प्रा.डॉ. सय्यद एस.आर. यांच्या हस्ते लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानिमित्त त्यांना

सामूहिक अभिवादन करण्यात आले. उपप्राचार्य डॉ. गवारे नानासाहेब यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, लोकमान्य टिळक यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेतला. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवक उपस्थित होते.



चंपावतीपत्र

वार -गुरूवार दि.०४-८-२०२२

**जय भवानी महाविद्यालयात लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठेची जयंती साजरी**

पाटोदा । वार्ताहर

येथिल जय भवानी महाविद्यालयात लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथि व अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे उपप्राचार्य व डॉ.गवारे एन.बी.व प्रा.डॉ.सय्यद एस.आर.सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.ए मदन शिंदे यांच्या हस्ते पुजन करण्यात आले.व सामुहिक अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभागाच्या वत्तीने करण्यात आले होते.या प्रसंगी सर्व प्राध्यापक व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

**01 ऑगस्ट 2022 - विदर्भ व महाराष्ट्रात अतिवृष्टी व पूरग्रस्तांना पाटोदा शहरात मदत फेरीचे आयोजन-**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने 01 ऑगस्ट 2022 रोजी विदर्भ व महाराष्ट्रात अतिवृष्टी व महापुराने अतोनात नुकसान झाले आहे. त्या पूरग्रस्तांना मानवतावादी दृष्टिकोनातून मदत करण्यासाठी विद्यार्थ्यांची पाटोदा शहरात मदत फेरी काढण्यात आली. या मदत फेरीतून अकरा हजाराची मदत गोळा करण्यात आली. ही मदत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर यांच्या हस्ते प्रशासनाकडे सुपूर्द

करण्यात आली आहे. या मदत फेरीचा शुभारंभ महाविद्यालयातील स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य श्री. दिलीपराव जाधव यांच्या शुभ हस्ते मदत पेटीत मदत टाकून करण्यात आली. ही मदत फेरी पाटोदा शहरातून काढण्यात आली. या मदत फेरीसाठी पाटोदा शहरातील व्यापारीवर्गाने तसेच सामान्य नागरिकांनी मदत केली. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. नानासाहेब गवारे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद, विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमअधिकारी आणि स्वयंसेवक उपस्थित होते.



चंपावतीपत्र वार -बुधवार दि.०३-८-२०२२

**जयभवानी महाविद्यालयाची पुरग्रस्तासांठी पाटोदा शहरात मदत फेरी**

पाटोदा । वार्ताहार

जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वत्तीने विदर्भ व महाराष्ट्रात अतिवृष्टी व महापुराने अतोनात नुकसान झाले आहे.त्या पुरग्रस्ताना मानवतावादी दृष्टीकोनातुन मदत करण्यासाठी विद्यार्थ्यांची पाटोदा शहरातुन मदत फेरी काढण्यात आली.

या फेरीतून ११ हजाराची मदत गोळा करण्यात आली.ही मदत लवकरच प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या हस्ते प्रशासनाकडे सुपूर्द केली जाणार आहे.या मदत फेरीचा शुभारंभ महाविद्यालयात स्थानिक नियामक मंडळा चे सदस्य दिलीप जाधव यांच्या शुभहस्ते मदतपेठीत मदत टाकुन करण्यात आला.ही मदत फेरी पाटोदा शहरातुन काढण्यात आली.व्यापारी वर्गाने मदत केली.या प्रसंगी उपप्राचार्य डॉ.गवारे एन.बी.राष्ट्रीय सेवायोजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.मदन शिंदे,प्रा.श्रीमती ज्योती रकटे व सर्व प्राध्यापक व बहुसंख्य विद्यार्थ्यांनी या मदत फेरीत सहभाग नोदंवला होता. यांमदत फेरीचे पाटोदा शहरातील नागरीकानी कौतुक केले.

**02 ते 06 ऑगस्ट 2022- वृक्षारोपण सप्ताहाचे आयोजन-**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने 02 ते 06 ऑगस्ट 2022 या दरम्यान वृक्षारोपण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी या कार्यक्रमाचे उद्घाटन केले तर प्रमुख पाहुणे म्हणून स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य माननीय श्री. दिलीपरावजी जाधव, महाराष्ट्र ग्रामीण बँक, पाटोदा येथील कर्मचारी श्रीमती प्रीती मॅडम यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे यांच्या हस्तेवृक्षारोपण करण्यात आले. महाविद्यालयाच्या परिसरात एकूण 50 झाडांचे

वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. नानासाहेब गवारे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद, विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमअधिकारी आणि स्वयंसेवक उपस्थित होते.





**05 ऑगस्ट 2022 - हर घर तिरंगा प्रबोधन फेरी (रॅली) -**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने 05 ऑगस्ट 2022 रोजी पाटोदा शहरातून हर घर तिरंगा प्रबोधन फेरीचे आयोजन करण्यात आले. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव यावर्षी देशभर उत्साह साजरा करण्यात आला. त्यानिमित्त पाटोदा शहरात हर घर तिरंगा याची जनजागृती करण्यासाठी प्रबोधन फेरी काढण्यात आली. या प्रबोधन फेरीचे उद्घाटन प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या शुभहस्ते करण्यात आले. ही फेरी संपूर्ण पाटोदा शहरातून काढण्यात आली. या प्रसंगी स्वातंत्र्याचा संदेश देणारे फलक व विविध

घोषणांनी भारतीय स्वातंत्र्याचा सूचक संदेश शहरातील नागरिकापर्यंत पोहोचवण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न या फेरीतील विद्यार्थ्यांनी केला. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. नानासाहेब गवारे, प्रा. डॉ. सय्यद एस. आर., प्रा. सोमनाथ घाडगे, प्रा. डॉ. वंदन जाधव, प्रा. डॉ. आहीरे बी. एम., प्रा. डॉ. जाधव एस. एम., प्रा. डॉ. बंडू लोखंडे, प्रा. डॉ. किर्दक विनोद, प्रा. नाईकवाडे पी.बी., प्रा. आनंद भगत, प्रा. शिवाजी भोरे, प्रा. गोविंद बामदळे, प्रा. जोशी बी. डी. याप्रसंगी विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवक उपस्थित होते.



चंपावतीपत्र वार -सोमवार दि.०८-८-२०२२

## जयभवानी महाविद्यालयाची स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त तिरंगा प्रभात फेरी

पाटोदा । वार्ताहर

स्वातंत्र्याचा अमृत मोहत्सव या वर्षी देशभर उत्साहात साजरा होत आहे. त्या निमित्त पाटोदा शहरात हर घर तिरंगा याची जनजागृति करण्यासाठी जयभवानी महाविद्यालयाच्या वतीने शहरात तिरंगा प्रभात फरी काढण्यात आली. या प्रभात फेरीचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वत्तीने करण्यात आले होते.

प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या शुभहस्ते या तिरंगा प्रभात फेरीचा शुभारंभ करण्यात आला. ही फेरी संपूर्ण पाटोदा शहरातुन काढण्यात आली होती. या प्रसंगी स्वातंत्र्याचा संदेश देणारे फलक व विविध घोषणांनी भारतीय स्वातंत्र्याचा सूचक संदेश शहरातील नागरीकापर्यंत पोहचवणयाचा एक प्रमाणिक प्रयत्न या फेरीतील विद्यार्थ्यांनी केला. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. नानासाहेब गवारे, सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. मदन शिंदे, प्रा. श्रीमती ज्योती रक्टे, प्रा. डॉ. सय्यद एस. आर., प्रा. सोमिनाथ घाडगे, प्रा. डॉ. बंडू लोखंडे, प्रा. नाईकवाडे पी. बी. प्रा. आनंद भगत प्रा. शिवाजी भोरे, [illegible] गोविंद बामदळे, प्रा. जोशी बी. डी., प्रा. बजरंग डिसले आदीसह बहुसंख्य [illegible] र्थ्यांनी या तिरंगा प्रभात फेरीत सहभाग नोंदवला होता. शेवटी महाविद्या[illegible] रून या प्रभात फेरीचा समारोप करण्यात आला.





**09 ऑगस्ट 2022- क्रांती दिन** -

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने 09 ऑगस्ट 2022 रोजी क्रांती दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथमतः क्रांतिवीरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून इतिहास विभाग प्रमुख प्रा सोमनाथ घाडगे यांची

उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे यांनी भारतीय स्वातंत्र्यलढा या विषयावर व्याख्यान दिले. तर अध्यक्ष समारोपात डॉ. विश्वास कदम यांनी क्रांतिकारकांच्या कार्याचा आढावा घेतला. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी तसेच स्वयंसेवक उपस्थित होते.

**08 ऑगस्ट ते 14 ऑगस्ट 2022 - स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयकॉनिक सप्ताहाचे आयोजन-**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने 08 ऑगस्ट ते 14 ऑगस्ट 2022 या दरम्यान स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयकॉनिक सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. त्या निमत्ताने पाटोदा शहरातून हर घर तिरंगा प्रबोधन फेरी चे आयोजन करण्यात आले. पाटोदा शहरातील ऐतिहासिक स्थळाची परिसर स्वच्छता करण्यात आली. पाटोदा शहरात ठिक ठिकाणी स्वच्छता करण्यात आली. तिरंगा यात्रा काढण्यात आली. तसेच ऐतिहासिक स्थळावर ध्वजारोहणाचा कार्यक्रम घेण्यात आला. हा आयकॉनिक सप्ताह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. मदन शिंदे, प्रा. श्रीमती ज्योती रकटे तसेच स्वयंसेवक उपस्थित होते.



**09 ते 17 ऑगस्ट 2022- स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अंतर्गत राज्य संरक्षित हुतात्मा स्मारक परिसर स्वच्छता अभियान-**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने 09 ते 17 ऑगस्ट 2022 या दरम्यान स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अंतर्गत राज्य संरक्षित हुतात्मा स्मारक परिसर स्वच्छता करण्यात आली. महाविद्यालय ते हुतात्मा स्मारक अशी भव्य मिरवणूक (पदयात्रा) पाटोदा शहरातून काढण्यात आली. पाटोदा शहरातील ऐतिहासिक हुतात्मा स्मारक परिसर स्वच्छता करण्यात आली. तसेच पाटोदा शहरातील ठीक ठिकाणी स्वच्छता करण्यात आली. हे अभियान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. मदन शिंदे, प्रा. श्रीमती ज्योती रकटे तसेच स्वयंसेवक उपस्थित होते.



**13 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट 2022 - हर घर तिरंगा अभियान -**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने 13 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट 2022 या दरम्यान हर घर तिरंगा अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत पाटोदा शहरात ठीक ठिकाणी पदयात्रा, प्रबोधन फेरी काढण्यात आली. तसेच स्वातंत्र्याच्या घोषणा देण्यात आल्या. पाटोदा शहरातील ऐतिहासिक हुतात्मा स्मारक परिसरात स्वच्छता करण्यात आली. पाटोदा शहरात ठिकठिकाणी स्वच्छता करण्यात आली. ऐतिहासिक स्मारकाच्या ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले. मौजे बांगरवाडी (दत्तकगाव) येथे प्रत्येक घरावर ध्वज लावण्यासाठी प्रत्येक नागरिकांला ध्वज व काठीचे वितरण करून ध्वजारोहणा संबंधी व ध्वज उतरवणे विषयी मार्गदर्शन केले. ध्वजाचा सन्मान होईल अशा पद्धतीने नागरिकांनी त्याची दखल घ्यावी हे सांगण्यात आले. त्याचबरोबर पाटोदा शहरातील नागरिकांना ध्वजारोहण व काठीचे वितरण करून ध्वजारोहणासंबंधी मार्गदर्शक सूचना करण्यात आल्या. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांना देखील ध्वजारोहण आणि काठीचे वितरण करून ध्वजारोहणासंबंधी मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. हे अभियान यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विश्र्वास कदम यांचे मार्गदर्शन लाभले. हे अभ्यान यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. मदन शिंदे, प्रा. श्रीमती ज्योती रकटे तसेच स्वयंसेवक यांनी सहभाग नोंदवला.





**स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत राबविलेले विविध कार्यक्रम-**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने 01 ऑगस्ट ते 17 ऑगस्ट या दरम्यान महाविद्यालयामध्ये स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या दरम्यान पाटोदा शहरात हर घर तिरंगा प्रबोधन फेरी, पदयात्रा काढण्यात आली. तसेच ऐतिहासिक हुतात्मा स्मारक परिसर स्वच्छता करण्यात आली. पाटोदा शहरात ठीक ठिकाणी स्वच्छता करण्यात आली. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने कोविड लसीकरण मोहीम राबविण्यात आली. तसेच विद्यार्थ्यासाठी निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

10 ऑगस्ट 2022 रोजी निबंध स्पर्धा घेण्यात आली. ‘माझ्या गावाचा ऐतिहासिक वारसा’ या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या निबंध स्पर्धेत महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी सहभागी झाले. या स्पर्धेचे परीक्षक प्रा. डॉ. वंदन जाधव, प्रा. डॉ. अहिरे बी. एम. यांनी केले. प्रथम क्रमांक कु. सारिका पांडुरंग, द्वितीय क्रमांक कु. मोरे दिपाली महादेव, तृतीय क्रमांक कु. तांबे वैष्णवी गजानन यांनी अनुक्रमे क्रमांक पटकावला. या यशस्वी विद्यार्थ्यांचा स्वातंत्र्यदिनी प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

11 ऑगस्ट 2022 रोजी वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त स्पर्धांचे आयोजित करण्यात आले. 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि युवक' या विषयावर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील या कार्यक्रमाचे उद्घाटक हिंदी विभागातील विभाग प्रमुख प्रा. डॉ. सय्यद एस. आर. यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेचे परीक्षक प्रा. डॉ. अहिरे बी. एम., प्रा. डॉ. देवगुडे अशोक नामदेव यांनी काम पाहिले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. तांबे वैष्णवी गजानन, द्वितीय क्रमांक कु. भंडारे स्वाती, तृतीय क्रमांक शिंदे सागर यांनी पटकावला. उत्तेजनार्थ कु. तांबे कोमल हिला प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. मदन शिंदे, प्रा. श्रीमती ज्योती रकटे तसेच स्वयंसेवक उपस्थित होते.



**14 ऑगस्ट 2022 'ध्वजारोहण' कार्यक्रम -**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने 10 ऑगस्ट 2022 रोजी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त सकाळी ठीक 9:40 वाजता ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख

पाहुणे म्हणून माननीय श्री गुलाबराव निळकंठ घुमरे (मा. सदस्य पंचायत समिती, पाटोदा), स्थानिक नियमक मंडळाचे सदस्य श्री. दिलीपराव जाधव, पारगाव येथील तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष माननीय श्री. नानासाहेब शेषराव हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून माननीय श्री गुलाबराव निळकंठ घुमरे (मा. सदस्य पंचायत समिती, पाटोदा) यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर हे होते. अध्यक्ष समारोपातसमारोपात बोलताना स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ‘हर घर तिरंगा अभियानचे महत्व’ नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना पटवून सांगितले. त्याचप्रमाणे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात सहभाग घेतल्याबद्दल सर्व मान्यवर पालक व विद्यार्थी यांना धन्यवाद देऊन आभार मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. मदन शिंदे, प्रा. श्रीमती ज्योती रकटे तसेच स्वयंसेवक उपस्थित होते.

**15 ऑगस्ट 2022-स्वातंत्र्य दिन- 75 वा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव-**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने 15 ऑगस्ट 2022 रोजी 75 वा भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. 75 व्या वर्धापन दिनानिमित्त महाविद्यालयाच्या प्रांगणात सकाळी ठीक 9:45 वाजता माननीय श्री सुरेश आश्रुबा राख (उपजिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा, बीड) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून माननीय श्री सुरेश आश्रुबा राख हे होते प्रमुख उपस्थिती माननीय श्री. दिलीपराव जाधव, स्थानिक नियमक मंडळ, पाटोदा श्री. शिवभूषण जाधव, श्री. कल्याणराव भोसले, श्री. नारायणराव दळवी, श्री. बप्पासाहेब जाधव, ॲड. नाईकनवरे माननीय श्री. अक्षय भैय्या आजबे (युवा नेते आष्टी मतदार संघ), श्री. अनिल शेठ बोरा, श्री. अब्दुल अण्णा घुगे इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते दिनांक 01/08/2022

ते 15/08/2022 या कालावधीत घेतलेल्या विविध स्पर्धातील प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ आलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. माननीय श्री. सुरेश राख यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्यासर्व क्रांतिकारकांना अभिवादन केले. सर्व स्वातंत्र्यवीरांना नमन करून त्यांनी दिलेल्या बलिदानाचा इतिहास थोडक्यात मांडला. कार्यक्रमाचा अध्यक्षिय समोर करताना महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर यांनी भारतीय स्वातंत्र्याचा लढा यावर प्रकाश टाकला. स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या सर्व क्रांतिकारकांना अभिवादन केले तसेच आपण सर्वांनी मिळून आपल्या देशाला प्रगतीपथावर पुढे नेण्याकरिता परिश्रम घेतले पाहिजेत असे आवाहन केले. स्वातंत्र्याचा 75 अमृत महोत्सव यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी- विद्यार्थिनी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. मदन शिंदे, प्रा. श्रीमती ज्योती रकटे तसेच स्वयंसेवक यांनी सहभाग घेतला.

**17 ऑगस्ट 2022- सामूहिक राष्ट्रगीत -**

जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने 17 ऑगस्ट 2022 रोजी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त सकाळी ठीक 11:00 वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात सामूहिक राष्ट्रगीताचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. मदन शिंदे, प्रा. श्रीमती ज्योती रकटे तसेच स्वयंसेवक उपस्थित होते.







